# महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
# DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH

Govt. Dental College & Hospital Building, St. George's Hospital Compound, Mumbai - 400 001.
Tel. No. +91-22-22620361-65/22652257/59 Telegram:" MEDUCATNSEARCH"
Fax: +91-22-22620562/22652168 Website: http://www.dmer.org


क्र.संवैशिवसं/प्रवेश/खाजगी महाविद्यालये/जाहीर सूचना/१-अ, दिनांक : २५ जुलै, २००६

## जाहीर सूचना

## खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमामधील प्रवेशाबाबत

खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमामधील प्रवेशासंबंधाने सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, असोसिएशन ऑफ अनएडेड प्रायव्हेट मेडिकल ॲन्ड डेन्टल कॉलेजेस्, पॅरेन्ट असोसिएशन ऑफ मेडिकल स्टुडन्टस् तसेच राज्य शासन यांनी सहमतीने तयार केलेली प्रवेशाची योजना माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ५ मे, २००६ रोजी मान्य केली आहे. (याचिका क्रमांक ६३३२/२००५)

आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम प्रवेशासाठी असोसिएशन ऑफ अनएडेड प्रायव्हेट मेडिकल ॲन्ड डेन्टल कॉलेजेस् यांच्या वतीने सामाईक प्रवेश परीक्षा घेण्यात आली असून पुढील प्रवेश प्रक्रियेबाबत मान्य झालेल्या योजनेची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहे.

सामाईक प्रवेश परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर असोसिएशनने अंतीम गुणवत्ता यादी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना एक आठवडयात सादर करण्यात यावी.

सदर गुणवत्ता यादी प्राप्त झाल्याबरोबर संचालनालयाच्या वेबसाईटवर जाहिर करण्यात यावी.

असोसिएशनकडे आलेल्या पसंती अर्जाचा एक संच सीडीसह एका आठवडयात संचालकांना सादर करण्यात यावा. संवर्गनिहाय व महाविद्यालयनिहाय प्रवेश क्षमतेची माहीती देखील त्याच वेळी सादर करण्यात यावा.

गुणवत्ता यादीनुसार प्रस्तावित प्रवेश यादीची प्रत असोसिएशनने संचालकांना ३ दिवसात द्यावी.

सदर यादी प्राप्त झाल्यानंतर संचालकांनी एका आठवडयात ती पडताळून पहावी आणि सदर कोणत्याही प्रवेशाला मान्यता नसल्यास तसे असोसिएशनला कळवावे. असोसिएशनमार्फत प्रस्ताविलेला कोणताही गुणवत्तेनुसार नसल्यास तशी हरकत संचालकांकडून घेण्यात येईल.

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या मान्यतेचा भंग करणारा एकही प्रवेश कोणतीही संस्था देणार नाही.

प्रत्येक महाविद्यालयातील शेवटची जागा भरेपर्यंत असोसिएशनने वरील प्रमाणचे प्रवेश फेऱ्या घ्यावयाच्या आहेत.

प्रवेशाची अंतीम यादी अंतिम प्रवेश झाल्याबरोबरच असोसिएशनच्या आणि संचालनालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द् करण्यात येईल.

मान्य केलेल्या उपरोक्त योजनेप्रमाणे आवश्यक ती माहिती असोसिएशनने संचालकांना अद्याप पोवतो सादर केलेली नाही. ही बाब संचालनालयाने असोसिएशनच्या निदर्शनास आणली आहे. वर नमूद केलेल्या योजनेप्रमाणे माहिती प्राप्त झाल्यानंतरच प्रवेश प्रक्रिया पार पाडता येईल.

तात्पर्य, मान्य झालेल्या योजने शिवाय केलेले कोणतेही प्रवेश बेकायदेशिर असतील असे प्रवेश घेणाऱ्या किंवा देणाऱ्याच्या बाबतीत कोणताही हक्क प्रस्थापित होणार नाही. माननीय न्यायालयाने नव्याने कोणतेही आदेश देईपर्यंत मान्य झालेली वरील प्रवेश प्रक्रियेची योजना अंमलात राहील.

सही/-

| | |
|---|---|
| मुंबई.<br><br>दिनांक : २५ जुलै, २००६ | (डॉ.डब्ल्यू. बी. तायडे)<br>संचालक,<br>वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई |